# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक ०४/११/२०२५ (मंगळवार )**

---

## पोलीस स्टेशन नरखेड अंतर्गत अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ४ आरोपीतां विरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये,गुन्हे नोंद

**पोलीस स्टेशन नरखेड** :— दिनांक ०४/११/२०२५ रोजी नरखेड पोलीस अवैध धंदयांवर कारवाई कामी पेट्रोलींग करीत असतांना उदासिन महाराज देवस्थान परीसरात आरोपी क्रमांक १. मधुकर लक्ष्मणराव सुळे रा. वार्ड क्र १३, इंदीरा नगर, नरखेड, जि. नागपुर, आरोपी क्रं २. मुन्ना हंसराज नरवरे, रा. वार्ड क्र नांदा शिंदे, नरखेड, आरोपी क्रं ३ रूपेश चंद्रभान कोरडे , रा. वार्ड क्रं १२ नरखेड हे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. तसेच सावरगाव रोड नरखेड येथे शेषराव भगवानजी नारनवरे, रा. वार्ड क्रं १४ आंबेडकर नगर, नरखेड अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. नमुद आरोपीतांवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये प्रत्येकी १ असे ४ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

## नागपुर ग्रामीण जिल्हयातील ६५४ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ०४/११/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ६५४ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुटिबोरी येथे २८ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३२ आरोपी अशा एकुण ९१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २४ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २९ आरोपी अशा एकुण ११४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे २८ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३६ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३१ आरोपी अशा एकुण ११२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे ३२ आरोपी अशा एकुण ६४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३८ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २६ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २४ आरोपी अशा एकुण १२० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ४२ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ४८ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३२ आरोपी अशा एकुण १५३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २१ पोलीस स्टेशन येथे एकुण ६५४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**



**अवैधरित्या देशी आणि मोहफुलाची दारू बाळगणाऱ्या / विक्री करणाऱ्या आरोपीतांवर नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई**
**९ गुन्हे नोंद एकुण ८९२०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त**

नागपुर ग्रामीण जिल्हयात **दिनांक ०३/११/२०२५** रोजी दारूबंदी कायद्या अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर तसेच सेवन करणाऱ्यांवर छापा टाकुन **देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण ८९२०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी नामे १) जिगर जगदिश पवार,वय २५ वर्षे ,२) गाणा शेरील घोसले, वय ३० वर्षे , दोन्ही रा. हिवरमठ ता. नरखेड,यांचेवर एक १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे सुरेश भिमराव मोहोड, वय ६० वर्ष, रा. आजनगांव काटोल, याचेवर १ गुन्हा नोंद आहे**, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे जयविरसिंग राजेशसिंग पटवा, वय २० वर्षे, रा. शेडेश्वर, ता. उमरेड, ह. मु गांगापुर झोपडपट्टी, ता. हिंगणा, जि. नागपुर याचेवर १ **गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन रामटेक** येथे आरोपी विनोद दामुजी धुर्वे, वय ३७ वर्षे, रा. काचुरवाही, ता.रामटेक,यांचेवर १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी विलास भिमराव उईके, वय ३६ वर्ष , रा. टेकाडी ता. सावनेर जि. नागपुर,यांचेवर १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन सावनेर** येथे आरोपी नामे

१.राहूल अजाबराव राउत, वय २७ वर्ष, रा परसोडी, केळवद, ता. सावनेर, २. मनोज रामाजी दोडके, वय ३५ वर्ष, मसोरा, ता. नरखेड, ह.मू. होळी चौक सावनेर आणि दोन महीला आरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे. अशा **आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ९ गुन्हे दाखल केले आहे.**

## रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक ०३/११/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक ०४/११/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्रीमती वृष्टि जैन, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड विभाग यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. तसेच पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत उमरेड शहरात मंगळवारी पेठ, इतवारी पेठ येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. सदर कोबिंग ऑपरेशन श्रीमती वृष्टी जैन यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. बायपास चौक येथे नाकाबंदी दरम्यान संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर कारवाईमध्ये उमरेड पोलीस स्टेशन सह दंगा नियत्रंण पथकाचे अंमलदार हजर होते.



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने